माहिती व तंत्रज्ञान संचालनालयास मंत्रालय मुख्य इमारतीमधील ७ व्या मजल्यावरील दालन क्र. ७०२ ची जागा वाटप करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्र.शाकाजा-१११९/प्र.क्र.५०/२०१९/२२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: १५ जुलै, २०१९

<u>प्रस्तावना</u> :-

मंत्रालय इमारतीच्या नुतनीकरणानंतर मा. मुख्यमंत्री/मंत्री/राज्यमंत्री तसेच वरीष्ठ प्रशासकीय अधिकारी यांचेसाठी माहिती तंत्रज्ञान विभागाच्या नियंत्रणाखाली एक दूरचित्रवाणी परिषद (V.C.) कक्ष निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले होते. सदर दूरचित्रवाणी कक्षासाठी मंत्रालय मुख्य इमारतीच्या ७ व्या मजल्यावरील दालन क्र. ७०२ मधील ४८६ चौ.फूट जागेचे वाटप माहिती व तंत्रज्ञान विभागास करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय :-

दूरचित्रवाणी परिषद (V.C.) कक्षाकरीता मंत्रालय मुख्य इमारतीच्या ७ व्या मजल्यावरील ४८६ चौ.फूट क्षेत्रफळ असलेल्या दालन क्र. ७०२ ची जागा माहिती व तंत्रज्ञान संचालनालयास (D.I.T.) वाटप करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार राष्ट्रीय माहिती केंद्र (N.I.C.) यांना देखील सदर दालन दूरचित्रवाणी परिषदेकरिता वापरता येईल.

२. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांनी उपरोक्त जागेचा ताबा संबंधितांना द्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१५११०४५५६२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradnya Prakash Sawant

Digitally signed by Pradnya Prakash Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dcab5c13648ccfdd9424ee4584da4e72f3f6f06dfd6b1eaa220fc9de68f36473, cn=Pradnya Prakash Sawant
Date: 2019.07.15 11:11:43 +05'30'

(प्र. प्र. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व सन्माननीय विधानसभा/परिषद व संसद सदस्य
२. मा.सभापतींचे सचिव/मा.अध्यक्षांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिवांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.

७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
९. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. उप महासंचालक, राष्ट्रीय माहिती केंद्र (N.I.C.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
११. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. सह सचिव (का.२२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१.
१४. उप अभियंता, दक्षिण उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एम.टी.डी.सी.समोर, मुंबई.
१५. शाखा अभियंता, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय आवार, मुंबई-३२.
१६. शाखा अभियंता (सा.बां.) बंगलो, नविन प्रशासन भवन, तळमजला, मंत्रालय, मुंबई-३२
१७. निवडनस्ती.